N.C.R.B (एन.सी.आर.बी.)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म-१)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

**1. District (जिल्हा):** रायगड **P.S.(ठाणे):** पेण **Year (वर्ष):** 2022

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0138 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 24/06/2022 03:46 बजे

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 23/06/2022
**Date To ( दिनांक पर्यंत):** 24/06/2022
**Time From (वेळेपासून):** 14:02 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 03:46 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 24/06/2022 **Time (वेळ):** 03:46 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 004 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 24/06/2022 03:46 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्थळ):**

**1.(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पश्चिम, 2 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** पेण ,पेण

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** संजय शंकर जाधव

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1980 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | साईवृंदावन सोसायटी, सेक्टर-54, रूम नं 1306 करंजाडे,पनवेल,पनवेल तालुका,रायगड, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | साईवृंदावन सोसायटी, सेक्टर-54, रूम नं 1306 करंजाडे,पनवेल,पनवेल तालुका,रायगड, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.): 91-9960991558**

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | मांगू नारायण गढरी 8329701724 | | | 1. साई प्लाझा, सेक्टर-15,,रूम नं सी/102, न्यु पनवेल,पनवेल,पनवेल, रायगड,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी संजय शंकर जाधव, वय 42 वर्षे, रा. करंजाडे, साईवृंदावन सोसायटी, सेक्टर-54, रूम. नं 1306, ता. पनवेल, जि. रायगड., (मोबाईल नंबर 9960991558) समक्ष पेण पोलीस ठाणे येथे हजर राहून खबर लिहून देतो की,

मी वरील ठिकाणी माझे कुटुंबासह राहतो. मी ग्रामसेवक म्हणुन नोकरीस असून मी झोतीरपाडा ग्रामपंचायत, ता.पेण येथे नेमणुकीस असून माझेकडे काराव ग्रामपंचायत ता. पेण येथील ग्रामसेवक पदाचा अतिरिक्त कार्यभार आहे. मी दिनांक 20/04/2022 रोजी पंचायत समिती पेण कार्यालयात मिटींगकरीता गेलो असता मला पंचायत समिती कार्यालयाकडून माझेकडे असलेला ग्रामपंचायत काराव, ता. पेणचा अतिरिक्त कार्यभार श्रीमती राजेश्री धनावडे, ग्रामसेवक यांचेकडे दिला असल्याबाबत गट विकास अधिकारी श्री. गढरी साहेबांचे सहीचे दिनांक 13/4/22 रोजीचे पत्र प्राप्त झाले.

त्याबाबत मी श्री. गढरी, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पेण यांना पंचायत समिती कार्यालय पेण येथे भेटलो असता, त्यावेळी मी त्यांना माझेकडे असलेला ग्रामपंचायत काराव, ता. पेणचा अतिरिक्त कार्यभार श्रीमती राजेश्री धनावडे, ग्रामसेवक यांचेकडे दिला असल्याबाबत पत्र मिळाले असल्याचे सांगीतले. तसेच मला ग्रामपंचायत झोतीरपाडा येथे तीन वर्ष झाल्याने तसेच मला बीपी चा त्रास असून जाणे-येणे लांब पडत असल्याने मला ग्रामपंचायत झोतीरपाडा ऐवजी ग्रामपंचायत काराव, ता. पेण हे मुख्यालय पाहिजे असल्याचे श्री. गढरी यांना सांगितले. त्यावेळी श्री. गढरी यांनी मला ग्रामपंचायत काराव, ता. पेण हे मुख्यालय देणेकरीता 20,000/-रूपये दयावे लागतील असे बोलले. त्यावेळी मी श्री. गढरी यांना एवढी रक्कम देणे शक्य नसल्याचे सांगीतले असता श्री. गढरी यांनी ग्रामसेवक श्रीमती धनावडे हया 30,000/- रूपये दयायला तयार आहेत तुला 20,000/- रूपये तरी दयावेच लागतील असे बोलून माझेकडे श्री. गढरी यांनी मला काराव ग्रामपंचायत हे मुख्यालय म्हणुन देण्यासाठी 20,000/- रूपये लाचेची मागणी केली.

त्यामुळे माझी खात्री झाली आहे की, श्री. गढरी यांना 20,000/- रूपये लाच दिल्याशिवाय ते माझे मुख्यालय बदलून देणार नाहीत. परंतु मला श्री. गढरी यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी श्री. गढरी, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पेण यांचेविरूध्द योग्य ती कारवाई होणेकरीता मी दिनांक 29/04/2022 रोजी पोनि/ श्री.गलांडे, अॅन्टी करप्शन ब्युरो, रायगड अलिबाग यांचेकडे पळस्पे फाटा पनवेल येथे समक्ष लेखी तक्रार दिली.

त्यानंतर पोनि/गलांडे यांनी मला सांगितले की, मी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने दिनांक 29/04/2022 रोजी पंचांसमक्ष पडताळणी करण्यात येईल व पडताळणीमध्ये लोकसेवक यांनी मला दिनांक 29/04/2022 रोजी मोबाईलवर संपर्क साधुन गणेष मंदीर टेकडी रामवाडी पेण येथे 16.00 वाजता हजर राहावयास सागितले.

नंतर पोनि श्री.गलांडे यांनी मला व दोन्ही पंचांना सांगितले की, तक्रारदार यांनी लोकसेवक श्री. गढरी यांना आपल काय करायच.....आणलेत
ते...असे बोलून लाचेची रक्कम आणली असल्याबाबत सांगितले असता लोकरोयक श्री. गढरी यांनी नंतर बघू... पहिले हे करून टाका... असे
सांगून तक्रारदार यांना पहिले त्यांचे मुख्यालय बदली संदर्भातील जिल्हा परिषद कार्यालयातील काम करून घेण्यास सांगीतल्याचे स्पष्ट होत आहे.
त्यामुळे सापळा कारवाईचे वेळी लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडून लाचेची रक्कम न स्विकारल्याने सापळा कारवाई स्थगित करून नंतर पुन्हा
लोकसेवक हे तक्रारदार यांना कार्यालयात बोलावतील अगर तक्रारदार यांचे जिल्हा परिषदेमधील काम पुर्ण होईल त्यावेळी पुन्हा तक्रारदार यांना
लोकसेवक यांची भेट घेण्यासाठी पाठवून लोकसेवक श्री. गढरी यांचेविरूध्द सापळा आजमाविला जाईल असे सांगून सापळयाची कार्यवाही
स्थगित केल्याचे सांगीतले.
त्याप्रमाणे पो.नि.गलांडे यांनी दिनांक 04/05/2022 रोजीची केलेली सापळा कारवाई स्थगित करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर पोनि/गलांडे
यांच्या सूचनेवरून पोना/खंडागळे यांनी माझे दिलेली 15,000/-रूपये लाचेची रक्कम त्यांच्या पॅन्टच्या मागील डावे हिपपाॅकेटमधून बाहेर
काढून एका लखोटयात भरून लखोटा सिलबंद करून ती रक्कम सापळयाच्या वेळी बाहेर काढली जाईल असे सांगितले. त्यानंतर तो लखोटा
सीलबंद करून त्या लखोटयावर दोन्ही पंचांनी व पोनि श्री.गलांडे यांनी सहया केल्या व तो लखोटा पोनि श्री.गलांडे यांनी ताब्यात घेतला.
त्यानंतर पोनि श्री.गलांडे साहेब यांनी दिनांक 04/05/2022 रोजी केलेली सापळा कार्यवाही स्थगित करण्यात येत असून तसे मला, पंचांस
व सापळा पथकातील अंमलदार यांना सांगितले. त्यानंतर पोनि गलांडे यांनी सांगितले की, कोणास संशय येवू नये म्हणून दिनांक
04/05/2022 रोजी केलेल्या सापळापुर्व, व सापळा स्थगिती कारवाईचा एकत्रित पंचनामा अलिबाग अॅसीबी कार्यालयात करण्यात येईल असे
सांगीतले व अॅसीबीचे अधिकारी, कर्मचारी व पंच हे अलिबाग येथे निघुन गेले.
त्यानंतर दिनांक 22/06/2022 रोजी मी श्री. गढरी यांची पंचायत समिती कार्यालय पेण येथे भेट घेतली असता श्री. गढरी यांनी माझे
मुख्यालय बदली संदर्भातील 15,000/- रूपयांबाबत विचारणा केली. त्यावेळी मी श्री. गढरी यांना जिल्हा परिषद अलिबाग कार्यालयातून बदली
संदर्भात काही झाले नसल्याचे सांगीतले. त्यावेळी श्री. गढरी हे जिल्हा परिषद कार्यालयातल मी बघतो असे मला सांगून सदर बदली संदर्भात
ठरलेले 15,000/- रूपये उदईक दिनांक 23/06/2022 रोजी कार्यालयात घेवून येण्यास सांगीतले. तसेच श्री. विकास कुभांर, ग्रामसेवक दिव
ग्रामपंचायत यांचे जिल्हा बदली संदर्भात श्री. कुंभार यांचेकडून 10,000/- रूपये घेवून येण्याबाबत श्री. गढरी यानी मला सांगीतले. त्यावेळी मी
श्री. गढरी यांना ठिक आहे असे सांगून कार्यालयातून निघून आलो.
त्यानंतर सदर हकिगत मी पोनि/गलांडे यांना फोनद्वारे सांगितली असता पोनि/गलांडे यांनी मला दि.23/06/2022 रोजी पेण येथे सापळा
कार्यवाहीकरीता हजर रहाणेबाबत कळविले. त्याप्रमाणे दि. 23/06/2022 रोजी मला पोनि श्री. गलांडे यांनी फोनद्वारे पेण बायपास रोड येथे
हजर राहण्याचे कळविले असता मी दि. 23/06/2022 रोजी 13ः10 वा. चे सुमारास पेण बायपास रोड येथे येवून पोनि/गलांडे यांना
भेटलो. त्यावेळी पोनि/गलांडे यांनी माझी व पंच व सापळा पथकासोबत ओळख करून दिली. पोनि/गलांडे यांनी मला व पंचाना सांगितले दि.
29/04/2022 रोजीचे पडताळणीचे अनुशंगाने लोकसेवक श्री. गढरी यांनी माझेकडुन माझे मुख्यालय बदलीचे संदर्भात पंधरा हजार रूपये
लाचेची मागणी केली असुन मागणीचे अनुशंगाने दि. 04/05/2022 रोजी सापळा कार्यवाही आजमावली असता लोकसेवक श्री. गढरी यांनी
त्यावेळेस पैषाचे नंतर बघु म्हणुन सांगितल्यामुळे दि. 04/05/2022 रोजीची सापळा कार्यवाही स्थगित केली होती. त्यावेळी सापळा कार्यवाहीत
वापरण्यात येणा-या पंधरा हजार रूपये च्या नोटा एका सिलबंद लखोटयात ठेवल्या होत्या. पोनि श्री. गलांडे यांच्या सुचनेप्रमाणे दिनांक
22/06/2022 रोजीचे पंचायत समिती येथिल लोकसेवक गढरी व माझ्या सोबत झालेल्या भेटी दरम्यान लोकसेवक गढरी घेडलेली हकिगत
पंचासमक्ष सांगितली.
त्यानंतर पोनि श्री. गलांडे यांनी श्री. गढरी यांचे विरूध्द सापळा आजमाविण्याचा निर्णय घेवून सापवळापुर्व पंचनाम्याची कार्यवाही सुरू केली.
त्यामध्ये माझी अंगझडती घेणे, मपोना/स्वप्नाली पाटील यांनी दिनांक 04/05/2022 रोजी ताब्यात घेण्यात आलेली लाचेची रक्कम बंद
लखोटयातून बाहेर काढून तीची अल्ट्राव्हाईलेट दिव्याचे प्रकाषात प्रात्यक्षिक करून दाखविले. त्यानंतर माझे व पंचांचे वक्तव्य नोंदवून त्यानंतर
माझेकडे लाचेची रक्कम असलेले 15,000/- रूपये दिले. त्यानंतर माझे कडे व्हाईस रेकाॅर्डर सुरू करून देवून मला व पंच नं. 1 श्री.
ओव्हाळ यांना सापळयाकरीता रवाना केले. त्याप्रमाणे मी व पंच नं. 1 श्री. ओव्हाळ असे माझे कारने पंचायत समिती कार्यालय पेण येथे गेलो.
त्यावेळी पोनि/गलांडे व पथक असे पंचायत समिती कार्यालयात व परिसरात सापळा रचून थांबून राहीले. त्यानंतर मी श्री. गढरी यांची त्यांचे
केबिनमध्ये जावून भेट घेतली असत त्यांचेत व माझेत बदली संदर्भात तसेच सीआर मत्ता व दायित्व संदर्भात चर्चा झाली. त्यानंतर श्री.गढरी हे
मला आणलेत? असे विचारून माझे कडे लाचेची मागणी केली त्यावेळी मी श्री. गढरी यांना माझे बदली संदर्भात 15000/- आणले असल्याचे व
श्री. कुंभार यांचे नंतर करू असे सांगीतले. त्यानंतर मी श्री. गढरी यांना माझेकडील 15000/- रू. लाचेची रक्कम दिली असता त्यांनी ती
स्विकारून त्यांचे टेबलचे ड्राव्हरमध्ये ठेवली. त्यानंतर मी केबीनचे बाहेर येवून जिन्याने खाली येवून सापळा पथकास दिसेल अषा रितीने माझे
उजवे हाताने डावे हाताची षर्टाची बाही वर करून लाचेची रक्कम दिल्याबाबत पुर्वनियोजीत इशारा केला. त्यानंतर पोनि/श्री. गलांडे व त्यांचे
पथकाने श्री. गढरी यांना रंगेहाथ पकडून लाचेची रक्कम त्यांचे टेबलचे उजव्या बाजूकडील ड्राव्हरमधून जप्त केली.
अषा रितीने श्री मांगू नारायण गढरी, वय 53 वर्षे, सहायक गट विकास अधिकारी, अतिरिक्त कार्यभार गट विकास अधिकारी, पंचायत समिती
पेण, ता. पेण (वर्ग-2 ) यांनी माझे मुख्यालय बदली साठी जिल्हा परिशद रायगड अलिबाग कार्यालयात अहवाल पाठविण्याकरीता दिनांक
29/04/2022 रोजी माझेकडे 20,000/- रूपये तडजोडी अंती 15,000/- लाचेची मागणी करून दिनांक 23/06/2022 रोजी लाचेची
रक्कम 15,000/- रूपये पंचायत समिती कार्यालय पेण येथील सहायक गट विकास अधिकारी केबिनमध्ये स्विकारले असता अॅन्टी करप्शन
ब्युरो, रायगड पथकाने रंगेहाथ पकडून लाचेची रक्कम त्यांचेकडून हस्तगत करण्यात आली.

म्हणुन माझी श्री मांगू नारायण गढरी, वय 53 वर्षे, सहायक गट विकास अधिकारी, अतिरिक्त कार्यभार गट विकास अधिकारी, पंचायत समिती पेण, ता. पेण (वर्ग-2) मुळ रा. साई प्लाझा, सेक्टर-15, रूम नं. सी/102, न्यु पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड यांचे विरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 चे कलम 7 प्रमाणे फिर्याद आहे.

ही फिर्याद दिली, सही दि. 23/06/2022

( संजय षकर जाधव )

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** Devendra Ramchandra Pol(I (Inspector)) / pobn77028 **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
**Rank (पद):**
**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**
**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**14.Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

**15.Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची**
**Name(नाव):** Devendra Ramchandra Pol
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** pobn77028

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /**
(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**